आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ मार्च २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रासह देशभरातल्या ८५ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी
- देशातल्या जल, जंगल, जमीनीवरचा आदिवासींचा हक्क अबाधित ठेवण्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं भारत जोडो न्याय यात्रेत आश्वासन
- हरयाणाचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे हरयाणा प्रदेशाध्यक्ष नायबसिंग सैनी यांचा शपथविधी
- आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून ४३ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

  **आणि**
- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या दुसऱ्या डावात ४१८ धावा /विदर्भाला विजयासाठी आणखी ५२८ धावांची गरज

<><><><><>

भारतीय रेल्वेमध्ये गेल्या दहा वर्षांत सर्वसमावेशक परिवर्तन झालं असून रेल्वेचा विकास हा सरकारच्या प्रमुख प्राधान्यांपैकी एक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज सकाळी गुजरातमध्ये अहमदाबाद इथं सुमारे ८५ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी दहा नवीन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यात महाराष्ट्रातल्या अहमदाबाद- मुंबई सेंट्रल गाडीचा समावेश आहे. रेल्वे प्रणालीचा विस्तार, पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, प्रवाशांसाठी सुविधा आणि रेल्वे फलाटांवर मेक इन इंडिया उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी

एनडीए सरकार अथक प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांनी यावेळी मालवाहतूकीसाठी समर्पित रेल्वेमार्गाच्या दोन खंडांचं उद्घाटनं केलं. तसंच ५१ गतिशक्ती मल्टीमॉडल कार्गो टर्मिनल्स आणि एक हजार ५०० हून अधिक एक स्टेशन एक उत्पादन स्टॉलचं लोकार्पण केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी २० हजार कोटींच्या पेट्रोकेमिकल प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणीही केली.

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रात लातूर इथल्या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचे दूरदृश्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आलं. या रेल्वे कोच फॅक्टरीमध्ये रेल्वे आणि मेट्रो कोच तसंच वंदेभारत रेल्वे गाड्यांची बांधणी होणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अहमदाबाद इथल्या अभय घाट इथं गांधी आश्रम स्मारकाच्या बृहत आराखड्याचं लोकार्पण केलं. तसंच त्यांनी पुनर्विकसित कोचरब आश्रमाचंही उद्घाटन केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राजस्थाममधल्या पोखरण इथं तिन्ही संरक्षण दलांच्या भारत शक्ती या सरावाला उपस्थित होते. स्वदेशी बनावटीच्या संरक्षण उपकरणांचे सामर्थ्य, भारत शक्ती या सरावात दाखवण्यात आलं. देशाला संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी बनवण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षांत अनेक मोठी पावले उचलली असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. संरक्षण उत्पादन दुपटीने वाढून सुमारे १ लाख कोटी रुपये झालं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या भारतीय टेकेड- विकसित भारतासाठी चिप्स या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. ते उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे सुमारे सव्वा लाख कोटी रुपये किमतीच्या तीन सेमीकंडक्टर प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत.

यामध्ये गुजरातमधल्या धोलेरा विशेष गुंतवणूक क्षेत्र इथं सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन सुविधा तसंच आसाम आणि गुजरातमध्ये बाह्यस्त्रोत सेमीकंडक्टर जोडणी आणि चाचणी सुविधा या प्रकल्पांचा समावेश आहे.

<><><><><>

आदिवासी हे देशाचे खरे मालक असून, देशातल्या जल, जंगल, जमीनीवरचा त्यांचा हक्क अबाधित ठेवणार, असं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलं आहे. त्यांनी सुरु केलेली भारत जोडो न्याय यात्रा आज महाराष्ट्रात नंदूरबारमधे पोचली. तिथं आयोजित सभेत ते बोलत होते. या देशातल्या जल, जंगल आणि जमीनीवर पहिला हक्क आदिवासींचा आहे, परंतु भारतीय जनता पक्ष आदिवासींना वनवासी म्हणून, हक्कापासून वंचित ठेवत आहे, असा आरोप त्यांनी केला. आदिवासांचे हक्क हिरावून घेतले जात आहेत. देशात आदिवासींची ८ टक्के लोकसंख्या आहे, पण त्याप्रमाणात सत्तेत भागिदारी नाही. काँग्रेस सत्तेत आल्यानंतर हे चित्र बदलेल आणि ज्यांची जेवढी लोकसंख्या तेवढा हक्क दिला जाईल, असं ते म्हणाले.

काँग्रेसला सत्ता मिळाली तर जमीन अधिग्रहण कायदा पुन्हा मजबूत केला जाईल. जातनिहाय जनगणना केली जाईल, शेतमालाला एमएसपीचा कायदा लागू केला जाईल, असं आश्वासन राहुल गांधी यांनी दिलं.

<><><><><>

भाजपाचे हरयाणा प्रदेशाध्यक्ष नायबसिंग सैनी यांनी आज संध्याकाळी हरयाणाचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांच्यासोबत ५ आमदारांचाही कॅबिनेट मंत्री म्हणून शपथविधी झाला. या शपथविधी सोहळ्याला माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टरही उपस्थित होते.

खट्टर यांनी आज सकाळी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर भाजपा विधीमंडळ पक्षाची बैठक झाली. त्यात सैनी यांची एकमतानं निवड झाली. बैठकीनंतर सैनी यांनी हरयाणाच्या राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेसाठी दावा केला.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं ४३ उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर केली. यातले १२ उमेदवार आसाममधले, प्रत्येकी १० मध्यप्रदेश आणि राजस्थान, गुजरात ७, उत्तराखंडमधले ३, तर एक उमेदवार दमण आणि दीवमधला आहे.

आसाममधल्या दौरहाट मतदारसंघातून गौरव गोगोई, मध्यप्रदेशात छिंदवाडा इथून माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांचे पुत्र आणि विद्यमान खासदार नकुल नाथ, तर राजस्थानमधे जालोरे मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री अशोक गहलोत यांचे पुत्र अशोक गहलोत निवडणूक लढवतील, असं काँग्रेसचे सरचिटणीस के सी वेणूगोपाल यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज तिसऱ्या दिवशी मुंबईनं दुसऱ्या डावात ४१८ धावा केल्या. पहिल्या डावात मुंबईनं ११९ धावांची आघाडी मिळवली होती. त्यामुळे त्यांच्याकडे एकूण ५४७ धावांची आघाडी झाली. आज दिवसअखेर दुसऱ्या डावात विदर्भानं बिनबाद १० धावा केल्या. आजचा खेळ थांबला तेव्हा अथर्व तायडे ३, आणि ध्रुव्र शौरी ७ धावांवर खेळत होता. विजयासाठी त्यांना आणखी ५२८ धावांची गरज आहे.

मुंबईनं, दुसऱ्या डावात केलेल्या मोठ्या धावसंख्येत मुशीर खानची १३६ धावांची शतकी खेळी, श्रेयस अय्यरच्या तडाखेबंद ९५ धावा, अंजिक्य रहाणेच्या ७३ धावा, आणि शम्स मुलाणीचं नाबाद अर्धशतक मोलाचं ठरलं.

विदर्भातर्फे हर्ष दुबेनं ५ गडी बाद केले. यश ठाकूरनं ३, तर आदित्य ठाकरे आणि अमन मोखाडे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

**<><><><><>**

भारताचा सलामीचा फलंदाज यशस्वी जयस्वालला आज आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं फेब्रुवारी २०२४ चा सर्वोत्कृष्ट खेळाडू घोषित केलं आहे. जयस्वाल सध्या चालू असलेल्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला असून, इंग्लंडबरोबरच्या कसोटी मालिकेत त्यानं दोन द्विशतकं झळकावली होती.

**<><><><><>**

राज्यशासनाच्या क्रीडा आणि युवक संचालनालयातर्फे आयोजित खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर संघाला सर्वसाधारण विजेतेपद, तर पुणे आणि सातारा संघाला उपविजेतेपद मिळालं आहे.

लातूर जिल्ह्यात उदगीर इथल्या क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत सिमारे ३०० खेळाडू सहभागी झाले होते. ग्रीको रोमन, फ्री स्टाईल आणि महिला गटात कोल्हापूरचा संघ अव्वल ठरला. कोल्हापूरच्या सोनबा गोंगाने या खेळाडूने ४ वैयक्तिक सुवर्णपदकं पटकावली.

**<><><><><>**

युवा खेळाडुंमधल्या गुणवत्तेचा शोध घेणाऱ्या कीर्ती या योजनेचा प्रारंभ केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंग ठाकूर यांनी आज चंदीगढ मधून केला.

या योजनेच्या माध्यमातून देशाच्या कानकोपऱ्यामधून तळागाळातल्या खेळाडूंचा शोध घेतला जाणार आहे. या योजनेच्या अंतर्गत महिलांसाठी समर्पित दोन नवीन राष्ट्रीय क्रीडा प्राविण्य केंद्रं उघडण्याची घोषणा करण्यात आली. या ठिकाणी फक्त महिला खेळाडूंना प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज आपल्या मॉरिशस दौऱ्यात मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून सहभागी झाल्या. हा कार्यक्रम चॅम्प डी मार्स इथं आयोजित केला होता. यावेळी मॉरिशसचे राष्ट्रपती पृथ्वीराजसिंग रूपून, मॉरिशसचे प्रधानमंत्री प्रविंद कुमार जगन्नाथ आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

मॉरिशसमधल्या महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर संस्थांमध्ये भारतीय वंशाच्या नागरिकांसोबत आयोजित कार्यक्रमातही मुर्मू सहभागी झाल्या. मॉरिशस विद्यापीठात झालेल्या एका कार्यक्रमात त्यांना डॉक्टरेटची मानद पदवी प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

दूरदर्शनच्या स्वराज-भारत के स्वतंत्रता संग्राम की समग्र गाथा या ऐतिहासिक मालिकेच्या ॲमॅझोन प्राईम या ओटीटी प्लॅटफॉर्मवरच्या प्रसारणाची प्रारंभ आज माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते झाला.

दूरजर्शनवर के सी बोकाडिया निर्मित सरदार द गेम चेंजर या मालिकेच्या प्रसारणाचा प्रारंभ देखील यावेळी करण्यात आला. भारताला जगाचे कंटेंट हब बनवायचं असल्याचं अनुराग सिंग ठाकूर यांनी यावेळी सांगितलं.

**//<><><><><>//**